.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 11 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ११ ॥

॥ दशक अकरावा : भीमदशक ॥ ११ ॥
समास पहिला : सिद्धांतनिरूपण
॥ श्रीराम ॥
आकाशापासून वायो होतो । हा तों प्रत्यये येतो ।
वायोपासून अग्नी जो तो । सावध ऐका ॥ १ ॥
वायोची कठीण घिसणी । तेथें निर्माण जाला वन्ही ।
मंद वायो सीतळ पाणी । तेथुनि जालें ॥ २ ॥
आपापासून जाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी ।
बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावचि आहे ॥ ३ ॥
मुळीं सृष्टी कल्पनेची । कल्पना आहे मुळींची ।
जयेपासून देवत्रयाची । काया जाली ॥ ४ ॥
निश्चळामधें चंचळ । ते चि कल्पना केवळ ।
अष्टधा प्रकृतीचें मूळ । कल्पनारूप ॥ ५ ॥
कल्पना तेचि अष्टधा प्रकृति । अष्टधा तेचि कल्पनामुर्ती ।
मुळाग्रापासून उत्पत्ति । अष्टधा जाणावी ॥ ६ ॥
पांच भूतें तीन गुण । आठ जालीं दोनी मिळोन ।
म्हणौनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजेते ॥ ७ ॥
मुळीं कल्पनारूप जाली । पुढें तेचि फापावली ।
केवळ जडत्वास आली । सृष्टिरूपें ॥ ८ ॥
मुळीं जाली ते मूळमाया । त्रिगुण जाले ते गुणमाया ।
जडत्व पावली ते अविद्या माया । सृष्टिरूपें ॥ ९ ॥
पुढें च्यारी खाणी जाल्या । च्यारी वाणी विस्तारल्या ।
नाना योनी प्रगटल्या । नाना वेक्ती ॥ १० ॥
ऐसी जाली उभारणी । आतां ऐका संव्हारणी ।
मागील दशकीं विशद करूनि । बोलिलें असे ॥ ११ ॥
परंतु आतां संकळित । बोलिजेल संव्हारसंकेत ।
श्रोते वक्ते येथें चित्त । देऊन ऐका ॥ १२ ॥
शत वरुषें अनावृष्टि । तेथें आटेल जीवसृष्टि ।
ऐशा कल्पांताच्या गोष्टी । शास्त्रीं निरोपिल्या ॥ १३ ॥
बाराकळीं तपे सूर्य । तेणें पृथ्वीची रक्षा होये ।
मग ते रक्षा विरोन जाये । जळांतरीं ॥ १४ ॥
तें जळ शोषी वैश्वानरु । वन्ही झडपी समीरु ।
समीर वितुळे निराकारु । जैसें तैसें ॥ १५ ॥
ऐसी सृष्टिसंहारणी जाली । मागां विस्तारें बोलिली ।
मायानिरासें उरली । स्वरूपस्थिति ॥ १६ ॥
तेथें जीवशिव पिंडब्रह्मांड । अटोन गेलें थोतांड ।
मायेअविद्येचें बंड । वितळोन गेलें ॥ १७ ॥
विवेकेंचि बोलिला क्षये । म्हणोनि विवेकप्रळये ।
विवेकी जाणती काये । मूर्खास कळे ॥ १८ ॥
सृष्टि शोधितां सकळ । येक चंचळ येक निश्चळ ।
चंचळास कर्ता चंचळ । चंचळरूपी ॥ १९ ॥
जो सकळ शरीरीं वर्ते । सकल कर्तुत्वास प्रवर्ते ।
करून अकर्ता हा वर्ते । शब्द जया ॥ २० ॥
राव रंक ब्रह्मादिक । सकळांमधें वर्ते येक ।
नाना शरीरें चाळक । इंद्रियेंद्वारें ॥ २१ ॥
त्यास परमात्मा बोलती । सकळ कर्ता ऐसें जाणती ।
परि तो नासेल प्रचिती । विवेकें पाहावी ॥ २२ ॥
जो स्वानामधें गुरुगुरितो । जो सूकरांमधें कुरुकुरितो ।
गाढवीं भरोन भुंकतो । आटाहास्यें ॥ २३ ॥
लोक नाना देह देखती । विवेकी देहांत पाहाती ।
पंडित समदर्शनें घेती । येणें प्रकारें ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥
विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥

देह पाहातां वेगळाले । परंतु अंतर येकचि जालें ।
प्राणीमात्र देखिलें । येकांतरें ॥ २५ ॥
अनेक प्राणी निर्माण होती । परी येकचि कळा वर्तती ।
तये नांव जगज्जोती । जाणतीकळा ॥ २६ ॥
श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचेमधें सीतोष्ण जाणे ।
चक्षुमधें पाहों जाणे । नाना पदार्थ ॥ २७ ॥
रसनेमधें रस जाणे । घ्राणामधें वास तो जाणे ।
कर्मइंद्रियामधें जाणे । नाना विषयस्वाद ॥ २८ ॥
सूक्ष्म रूपें स्थूळ रक्षी । नाना सुखदुःखें परीक्षी ।
त्यास म्हणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ॥ २९ ॥
आत्मा अंतरात्मा विश्वात्मा । चैतन्य सर्वात्मा सुक्ष्मात्मा ।
जीवात्मा शिवात्मा परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप ॥ ३० ॥
विकारामधील विकारी । अखंड नाना विकार करी ।
तयास वस्तु म्हणती भिकारी । परम हीन ॥ ३१ ॥
सर्व येकचि दिसती । अवघा येकंकार करिती ।
ते अवघी माईक स्थिती । चंचळामधें ॥ ३२ ॥
चंचळ माया ते माईक । निश्चळ परब्रह्म येक ।
नित्यानित्यविवेक । याकारणे ॥ ३३ ॥

जातो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान ।
जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ॥ ३४ ॥
ऐक्य जीव तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांडनिरास ।
येथें सांगितले विशेष । चत्वार जीव ॥ ३५ ॥
असो हें अवघें चंचळ । चंचळ जाईल सकळ ।
निश्चळ तें निश्चळ । आदिअंतीं ॥ ३६ ॥
आद्य मध्य अवसान । जे वस्तु समसमान ।
निर्विकारी निर्गुण निरंजन । निःसंग निःप्रपंच ॥ ३७ ॥
उपाधीनिरासें तत्वता । जीवशिवास ऐक्यता ।
विवंचून पाहों जातां । उपाधि कैंची ॥ ३८ ॥
असो जाणणें तितुकें ज्ञान । परंतु होतें विज्ञान ।
मनें वोळखावें उन्मन । कोण्या प्रकारें ॥ ३९ ॥
वृत्तिस न कळे निवृत्ति । गुणास कैंची निर्गुणप्राप्ती ।
गुणातीत साधक संतीं । विवेकें केलें ॥ ४० ॥
श्रवणापरीस मनन सार । मननें कळे सारासार ।
निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥ ४१ ॥
निर्गुणीं जे अनन्यता । तेचि मुक्ति सायोज्यता ।
लक्ष्यांश वाच्यांश आतां । पुरे जाला ॥ ४२ ॥
अलक्षीं राहिलें लक्ष । सिद्धांतीं कैंचा पूर्वपक्ष ।
अप्रत्यक्षास कैंचें प्रत्यक्ष । असोन नाहीं ॥ ४३ ॥
असोन माईक उपाधी । तेचि सहजसमाधी ।
श्रवणें बळावी बुद्धी । निश्चयाची ॥ ४४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सिद्धांतनिरूपणनाम समास पहिला ॥ १ ॥ ११.१

समास दुसरा : चत्वारदेवनिरूपण

॥ श्रीराम ॥

येक निश्चळ येक चंचळ । चंचळीं गुंतलें सकळ ।
निश्चळ तें निश्चळ । जैसें तैसें ॥ १ ॥
पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमधें येक ।
निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळचि तो ॥ २ ॥
या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुन्हां चंचळाकडे धांवती ।
चंचळचक्रीं निघोन जाती । ऐसे थोडे ॥ ३ ॥
चंचळीं चंचळ जन्मलें । चंचळाचि मधें वाढलें ।
अवघें चंचळचि बिंबलें । जन्मवरी ॥ ४ ॥
पृथ्वी अवघी चंचळाकडे । करणें तितुकें चंचळीं घडे ।
चंचळ सांडून निश्चळीं पवाडे । ऐसा कैंचा ॥ ५ ॥
चंचळ कांहीं निश्चळेना । निश्चळ कदापी चळेना ।
नित्यानित्यविवेकें जना । उमजे कांहीं ॥ ६ ॥
कांहीं उमजलें तरी नुमजे । कांहीं समजलें तरी न समजे ।
कांहीं बुझे तरी निर्बुजे । किंचित मात्र ॥ ७ ॥
संदेह अनुमान आणी भ्रम । अवघा चंचळामधें श्रम ।
निश्चळीं कदा नाहीं वर्म । समजलें पाहिजे ॥ ८ ॥
चंचळाकरी तितुकी माया । माईक जाये विलया ।
लहान थोर म्हणावया । कार्य नाहीं ॥ ९ ॥
सगट माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फांपावली ।
चित्रविचित्र विकारली । नाना रूपें ॥ १० ॥
नाना उत्पत्ती नाना विकार । नाना प्राणी लाहान थोर ।
नाना पदार्थ मकार । नाना रूपें ॥ ११ ॥
विकारवंत विकारलें । सूक्ष्म जडत्वा आलें ।
अमर्याद दिसों लागलें । कांहींचाबाहीं ॥ १२ ॥
मग नाना शरीरें निर्माण जालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं ।
भाषा परत्वें कळों आलीं । काहीं कांहीं ॥ १३ ॥
मग नाना रीति नाना दंडक । आचार येकाहून येक ।
वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ॥ १४ ॥
अष्टधा प्रकृतीचीं शरीरें । निर्माण जालीं लाहानथोरें ।
पुढें आपुलाल्या प्रकारें । वर्तों लागती ॥ १५ ॥
नाना मत्तें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं ।
नाना प्रकारीचीं उठिलीं । नाना बंडें ॥ १६ ॥
जैसा प्रवाह पडिला । तैसाच लोक चालिला ।
कोण वारील कोणाला । येक नाहीं ॥ १७ ॥
पृथ्वीचा जाला गळांठा । येकाहून येक मोठा ।
कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ॥ १८ ॥
आचार बहुकाचिंत पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला ।
अवघा वरपंगचि जाला । साभिमानें ॥ १९ ॥
देव जाले उदंड । देवांचें मांडलें भंड ।
भूतादेवतांचें थोतांड । येकचि जालें ॥ २० ॥
मुख्य देव तो कळेना । काशास कांहींच मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥ २१ ॥
ऐसा नासला विचार । कोण पाहातो सारासार ।
कैचा लहान कैंचा थोर । कळेचिना ॥ २२ ॥
शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गल्बला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ॥ २३ ॥
ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें ।
अवघें अनायेक जालें । चहूंकडे ॥ २४ ॥
मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ २५ ॥
असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन ।
म्हणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ २६ ॥
लोक वर्तती सकळ । तें ज्ञात्यास करतळामळ ।
आतां ऐका केवळ । विवेकी हो ॥ २७ ॥
लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती ।
ऐसी हे रोकडी प्रचिती । सावध ऐका ॥ २८ ॥
मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक ।
बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमादेवीं ॥ २९ ॥
नाना देवांचे अवतार । चरित्रें ऐकती येक नर ।
जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥ ३० ॥

येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा ।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ॥ ३१॥
येक ते निर्मळ निश्चळ । कदापी नव्हेति चंचळ ।
अनन्यभावें केवळ । वस्तुच ते ॥ ३२॥
येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा ।
तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ॥ ३३॥
ऐसे हे चत्वार देव । सृष्टीमधील स्वभाव ।
यावेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ॥ ३४॥
अवघें येकचि मानिती । ते साक्ष देव जाणती ।
परंतु अष्टधा प्रकृति । वोळखिली पाहिजे ॥ ३५॥
प्रकृतीमधील देव । तो प्रकृतीचा स्वभाव ।
भावातीत माहानभाव । विवेकें जाणावा ॥ ३६॥
जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल ।
जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ॥ ३७॥
क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती ।
सारासार जाणती । ते माहानभाव ॥ ३८॥
अरे जो चंचळास ध्याईल । तो सहजचि चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ॥ ३९॥
प्रकृतीसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें ।
सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ॥ ४०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चत्वारदेवनिरूपणनाम समास दुसरा ॥ २॥ ११.२

समास तिसरा : शिकवण निरूपण

॥ श्रीराम ॥

बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ।
येथें वर्तावें चोखट । नितिन्यायें ॥ १॥
प्रपंच करावा नेमक । पाहावा परमार्थविवेक ।
जेणेंकरितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ २॥
शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बाळपण नेणतां गेलें ।
तारुण्य अवघें वेचलें । विषयांकडे ॥ ३॥
वृद्धपणीं नाना रोग । भोगणें लागे कर्मभोग ।
आतां भगवंताचा योग । कोणे वेळे ॥ ४॥
राजिक देविक उदेग चिंता । अन्न वस्त्र देहममता ।
नाना प्रसंगें अवचिता । जन्म गेला ॥ ५॥
लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचिती ।
जाणत जाणत निश्चिती । काये मानिलें ॥ ६॥
अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला ।
तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ॥ ७॥
पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड जाला ।
येमयातनेचा झोला । कठीण आहे ॥ ८॥
तरी आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें ।
इहलोक परत्र साधावें । दोहीकडे ॥ ९॥
आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुख म्हणौन आवडे । आळसी लोकां ॥ १०॥
साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती ।
खाती जेविती सुखी होती । येत्नेंकरूनी ॥ ११॥
आळस उदास नागवणा । आळस प्रेत्नबुडवणा ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट करिती ॥ १२॥
म्हणौन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ १३॥
प्रेत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण ।
सावध करून अंतःकरण । निमिष्य येक ॥ १४॥
प्रातःकाळी उठावें । कांहीं पाठांतर करावे ।
येथानशक्ती आठवावें । सर्वोत्तमासी ॥ १५॥
मग दिशेकडे जावें । जे कोणासिच नव्हे ठावें ।
शौच्य आचमन करावें । निर्मळ जळें ॥ १६॥
मुखमार्जन प्रातःस्नान । संध्या तर्पण देवतार्चन ।
पुढें वैश्यदेवउपासन । येथासांग ॥ १७॥
कांहीं फळाहार घ्याव । मग संसारधंदा करावा ।
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ १८॥
ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावे खबर्दार ।
दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ॥ १९॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण जालियां चर्फडी ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचित पाहा ॥ २०॥
याकारणें सावधान । येकाग्र असावें मन ।
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ २१॥
पुढें भोजन जालियांवरी । कांहीं वाची चर्चा करी ।
येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ २२॥
तरीच प्राणी शाहाणा होतो । नाहींतरी मूर्खचि राहातो ।
लोक खाती आपण पाहातो । दैन्यवाणा ॥ २३॥
ऐक सदेवपणाचें लक्षण । रिकाम्या जाऊं नेदी येक क्षण ।
प्रपंचवेवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ २४॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ २५॥
कांहीं धर्मचर्चा पुराण । हरीकथा निरूपण ।
वायां जऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ २६॥
ऐसा जो सर्वसावध । त्यास कैंचा असेल खेद ।
विवेकें तुटला समंध । देहबुद्धीचा ॥ २७॥
आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
मूळ तुटें उद्वेगाचें । येणें रीतीं ॥ २८॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचिकर्ण ।
माहावाक्याचें विवरण । करितां सुटे ॥ २९॥
कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान ।
परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सिकवणनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३॥ ११.३

समास चौथा : सारविवेकनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म म्हणिजे निराकार । गगनासारिखा विचार ।
विकार नाहीं निर्विकार । तेंचि ब्रह्म ॥ १ ॥
ब्रह्म म्हणिजे निश्चळ । अंतरात्मा तो चंचळ ।
द्रष्टा साक्षी केवळ । बोलिजे तया ॥ २ ॥
तो अंतरात्मा म्हणिजे देव । त्याचा चंचळ स्वभाव ।
पाळिताहे सकळ जीव । अंतरी वसोनी ॥ ३ ॥
त्यावेगळे जड पदार्थ । तेणेंवीण देह वेर्थ ।
तेणेंचि कळे परमार्थ । सकळ कांही ॥ ४ ॥
कर्ममार्ग उपासना मार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । देवची चालवी ॥ ५ ॥
चंचळेविण निश्चळ कळेना । चंचळ तरी स्थिरावेना ।
ऐसें हे विचार नाना । बरे पाहा ॥ ६ ॥
चंचळनिश्चळाची संधी । तेथें भांबावते बुद्धि ।
कर्ममार्गाचे जे विधी । ते मग ऐलिकडे ॥ ७ ॥
देव या सकळांचे मूळ । देवास मूळ ना डाळ ।
परब्रह्म तें निश्चळ । निर्विकारी ॥ ८ ॥
निर्विकारी आणि विकारी । येक म्हणेल तो भिकारी ।
विचाराची होते वारी । देखतदेखतां ॥ ९ ॥
सकळ परमार्थास मूळ । पंचीकर्ण माहावाक्य केवळ ।
तेंची करावें प्रांजळ । पुनःपुन्हां ॥ १० ॥
पहिला देह स्थूळकाया । आठवा देह मूळमाया ।
अष्ट देह निर्शेलियां । विकार कैंचा ॥ ११ ॥
याकारणें विकारी । साचाऐसी बाजीगरी ।
येक समजे येक खरी । मानिताहे ॥ १२ ॥
उत्पत्ति स्थिती संव्हार । यावेगळा निर्विकार ।
कळायासाठीं सारासार । विचार केला ॥ १३ ॥
सार असार दोनी येक । तेथें कैंचा उरला विवेक ।
परिक्षा नेणती रंक । पापी करंटे ॥ १४ ॥
जो येकचि विस्तारला । तो अंतरात्मा बोलिला ।
नाना विकारीं विकारला । निर्विकारी नव्हे ॥ १५ ॥
ऐसें प्रगटचि आहे । आपुल्या प्रत्ययें पाहे ।
काय राहे काय न राहे । हें कळेना ॥ १६ ॥
जें अखंड होत जातें । जें सर्वदा संव्हारतें ।
रोकडें प्रचितीस येतें । जनामधें ॥ १७ ॥
येक रडे येक चर्फडी । येकांची धरी नरडी ।
येकमेकां झोंबती बराडी । दुकळ्ळले जैसे ॥ १८ ॥
नाहीं न्याये नाहिं नीति । ऐसे हे लोक वर्तती ।
आणि अवघेंच सार म्हणती । विवेकहीन ॥ १९ ॥
धोंडे सांडून सोनें घ्यावें । माती सांडून अन्न खावें ।
आणि आवघेंचि सार म्हणावें । बाष्कळपणें ॥ २० ॥
म्हणौनि हा विचार करावा । सत्यमार्ग तोचि धरावा ।
लाभ जाणोन घ्यावा । विवेकाचा ॥ २१ ॥
सारगार येकचि सरी । तेथें परीक्षेस कैंची उरी ।
याकारणें चतुरीं । परीक्षा करावी ॥ २२ ॥
जेथें परीक्षेचा अभाव । तेथें दे घाव घे घाव ।
सगट सारिखा स्वभाव । लौंदपणाचा ॥ २३ ॥
घेव ये तेंचि घ्यावें । घेव न ये तें सोंडावें ।
उंच नीच वोळखावें । त्या नाव ज्ञान ॥ २४ ॥
संसारसांतेस आले । येक लाभें अमर जाले ।
येक ते करंटे ठकले । मुदल गेलें ॥ २५ ॥
जाणत्यानें ऐसें न करावें । सार तेंचि शोधून घ्यावें ।
असार तें जाणोन त्यागावें । वमक जैसें ॥ २६ ॥
तें वमक करी प्राशन । तरी तें स्वानाचें लक्षण ।
तेथें सुचिस्मंत ब्राह्मण । काय करी ॥ २७ ॥
जेहिं जैसें संचित केलें । तयास तैसेंचि घडलें ।
जें अभ्यासीं पडोन जडलें । तें तों सुटेना ॥ २८ ॥
येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्टा सावडिती ।
आपुल्या वडिलांचा घेती । साभिमान ॥ २९ ॥
असो विवेकेविण । बोलणें तितुका सीण ।
कोणीयेकें श्रवण मनन । केलेंचि करावें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सारविवेकनिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥ ११.४

समास पांचवा : राजकारण निरूपण

॥ श्रीराम ॥

कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें ।
विवरलेंचि विवरावें । पुन्हा निरूपण ॥ १ ॥
तैसें आम्हांस घडलें । बोलिलेंचि बोलणें पडिलें ।
कां जें बिघडलेंचि घडलें । पाहिजे समाधान ॥ २ ॥
अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव ।
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ ३ ॥
मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकरण ।
तिसरें तें सावधपण । सर्वविषई ॥ ४ ॥
चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षप ।
अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ॥ ५ ॥
जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासि अंतर । पडोंच नेदावें ॥ ६ ॥
संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा ।
प्रपंचहि सावरावा । येथानशक्त्या ॥ ७ ॥
प्रपंचसमयो वोळखावा । धीर बहुत असावा ।
संमंध पडों नेदावा । अति परी तयाचा ॥ ८ ॥
उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें ।
नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ९ ॥
दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १० ॥

तऱ्हे भरोंच नये । सुचावे नाना उपाये ।
नव्हे तेंचि करावें कायें । दीर्घ प्रेत्नें ॥ ११ ॥
फड नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा ।
अतिवाद न करावा । कोणीयेकासी ॥ १२ ॥
दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दिगांतराप्रती ॥ १३ ॥
दुखः दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १४ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १५ ॥
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।
क्रिया करून करवावी । बहुतांकरवीं ॥ १६ ॥
करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।
परस्परेंचि प्रत्यये । प्रचितीस आणावा ॥ १७ ॥
जो बहुतांचे सोसीन । त्यास बहुतेक लोक मिळेना ।
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १८ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें ।
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १९ ॥
लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे ।
पुन्हा मेळऊन घ्यावें । दुरील दोरे ॥ २० ॥
हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें ।
समंध पडता सोडून जावें । येकीकडे ॥ २१ ॥
ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण ।
सुचित अस्तां अंतःकरण । राजकारण जाणे ॥ २२ ॥
वृक्षीं रूढासी उचलावें । युद्धकर्त्यास ढकलून द्यावें ।
कारबाराचें सांगावें । आंग कैसें ॥ २३ ॥
पाहातां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना ।
आलें वैभव अभिळासीना । कांहीं केल्यां ॥ २४ ॥
येकांची पाठी राखणें । येकांस देखो न सकणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २५ ॥
न्याय बोलतांहि मानेना । हित तेंचि न ये मना ।
येथें कांहींच चालेना । त्यागेंवीण ॥ २६ ॥
श्रोतीं कळोन आक्षेपिलें । म्हणौन बोलिलेंचि बोलिलें ।
न्यूनपूर्ण क्ष्मा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ २७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
राजकारणनिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ ११.५

समास सहावा : महंत लक्षण

॥ श्रीराम ॥

शुद्ध नेटकें ल्याहावें । लेहोन शुद्ध शोधावें ।
शोधून शुद्ध वाचावें । चुकों नये ॥ १ ॥
विश्कळित मात्रुका नेमस्त कराव्या । धात्या जाणोन सदृढ धराव्या ।
रंग राखोन भराव्या । नाना कथा ॥ २ ॥
जाणायाचें सांगतां न ये । सांगायाचें नेमस्त न ये ।
समजल्याविण कांहींच न ये । कोणीयेक ॥ ३ ॥
हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ॥ ४ ॥
पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे ।
सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ५ ॥
दीर्घ सूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे ।
जाणजाणोनि निवळे । येथायोग्य ॥ ६ ॥
ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिमंत ।
यावेगळें अंतवंत । सकळ कांहीं ॥ ७ ॥
ताळवेळ तानमानें । प्रबंद कविता जाड वचनें ।
मज्यालसी नाना चिन्हें । सुचती तया ॥ ८ ॥
जो येकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भीचें ॥ ९ ॥
आधींच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ १० ॥
अक्षर सुंदर वाचणें सुंदर । बोलणें सुंदर चालणें सुंदर ।
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ११ ॥
जयास येत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे ।
धीटपणें प्रगटे दडे । ऐसा नव्हे ॥ १२ ॥
सांकडीमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणे ।
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ॥ १३ ॥
आहे तरी सर्वा ठाई । पाहों जातां कोठेंचि नाहीं ।
जैसा अंतरात्मा ठाईचा ठाई । गुप्त जाला ॥ १४ ॥
त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीतसे । प्राणीमात्रांसी ॥ १५ ॥
तैसाच हाहि नानापरी । बहुत जनास शाहाणे करी ।
नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्मा ॥ १६ ॥
आपणाकरितां शाहाणे होती । ते सहजचि सोये धरिती ।
जाणतेपणाची महंती । ऐसी असे ॥ १७ ॥
राखों जाणें नीतिन्याय । न करी न करवी अन्याये ।
कठीण प्रसंगीं उपाये । करूं जाणे ॥ १८ ॥
ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
महंतलक्षणनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ ११.६

समास सातवा : चंचळ नदी

॥ श्रीराम ॥

चंचळ नदी गुप्त गंगा । स्मरणें पावन करीं जगा ।
प्रचित रोकडी पाहा गा । अन्यथा नव्हे ॥ १ ॥
केवळ अचंचळीं निर्माण जाली । अधोमुखें बळें चालिली ।
अखंड वाहे परी देखिली । नाहींच कोणीं ॥ २ ॥
वळणें वांकाणें भोवरे । उकळ्या तरंग झरे ।
लादा लाटा कातरे । ठाई ठाई ॥ ३ ॥

शुष्क जळाचे चळाळ । धारा धबाबे खळाळ ।
चिपळ्या चळक्या भळाळ । चपळ पाणी ॥ ४॥
फेण फुगे हेलावे । सैरावैरा उदक धावे ।
थेंब फुई मोजावे । अणुरेणु किती ॥ ५॥
वोसाणे वाहती उदंड । झोतावे दर्कुटे दगड ।
खडकें बेटें आड । वळसा उठे ॥ ६॥
मृद भूमी तुटोन गेल्या । कठीण तैश्याचि राहिल्या ।
ठाई ठाई उदंड पाहिल्या । सृष्टीमधें ॥ ७॥
येक ते वाहतचि गेले । येक वळशामधें पडिले ।
येक सांकडींत आडकले । अधोमुख ॥ ८॥
येक आपटआपटोंच गेली । येक चिरडचिदोंच मेलीं ।
कितीयेक ते फुगलीं । पाणी भरलें ॥ ९॥
येक बळाचे निवडले । ते पोहतचि उगमास गेले ।
उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप ॥ १०॥
तेथें ब्रह्मादिकांचीं भुवनें । ब्रह्मांडदेवतांचीं स्थानें ।
उफराटी गंगा पाहातां मिळणें । सकळांस तेथें ॥ ११॥
त्या जळाऐसें नाही निर्मळ । त्या जळाऐसें नाहीं चंचळ ।
आपोनारायण केवळ । बोलिजे त्यासी ॥ १२॥
माहानदी परी अंतराळीं । प्रत्यक्ष वाहे सर्वकाळीं ।
स्वर्गमृत्युपाताळीं । पसरली पाहा ॥ १३॥
अधोर्ध अष्टहि दिशा । तिचें उदक करी वळसा ।
जाणते जाणती जगदीशा । सारिखीच ते ॥ १४॥
अनंत पात्रीं उदक भरलें । कोठें पाझपाझरोंच गेलें ।
कितीयेक तें वेचलें । संसारासी ॥ १५॥
येक्यासंगे तें कडवट । येक्यासंगें तें गुळचट ।
येक्यासंगे ते तिखट । तुरट क्षार ॥ १६॥
ज्या ज्या पदार्थास मिळे । तेथें तद्रूपचि मिसळे ।
सखोले भूमीस तुंबळे । सखोलपणें ॥ १७॥
विषामधें विषचि होतें । अमृतामधें मिळोन जाते ।
सुगंधीं सुगंध तें । दुर्गंधीं दुर्गंध ॥ १८॥
गुणीं अवगुणीं मिळे । ज्याचें त्यापरी निवळे ।
त्या उदकाचा महिमा न कळे । उदकेंविण ॥ १९॥
उदक वाहे अपरंपार । न कळे नदी कीं सरोवर ।
जळवास करून नर । राहिले कितीयेक ॥ २०॥
उगमापैलिकडे गेले । तेथें परतोन पाहिलें ।
तंव तें पाणीच आटलें । कांहीं नाहीं ॥ २१॥
वृत्तिसुन्य योगेश्वर । याचा पाहावा विचार ।
दास म्हणे वारंवार । किती सांगों ॥ २२॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चंचळ नदीनिरूपणनाम समास सातवा ॥ ७॥ ११.७

समास आठवा : अंतरात्माविवरण

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं सकळकर्ता । समस्त देवांचा जो भर्ता ।
त्याचे भजनीं प्रवर्ता । कोणीतरी ॥ १॥
तेणेंविण कार्य न चले । पडिलें पर्ण तेंहि न हाले ।
अवघें त्रैलोक्येचि चाले । जयाचेनी ॥ २॥
तो अंतरात्मा सकळांचा । देवदानवमानवांचा ।
चत्वारखाणीचत्वारवाणीचा । प्रवर्तकु ॥ ३॥
तो येकलाचि सकळां घटीं । करी भिन्नभिन्ना राहाटी ।
सकळ सृष्टीची गोष्टी । किती म्हणोन सांगावी ॥ ४॥
ऐसा जो गुप्तेश्वर । त्यास म्हणावें ईश्वर ।
सकळ ऐश्वर्य थोर थोर । जयाचेनि भोगिती ॥ ५॥
ऐसा जेणें वोळखिला । तो विश्वंभरचि जाला ।
समाधी सहजस्थितीला । कोण पुसे ॥ ६॥
अवघें त्रैलोक्य विवरावें । तेव्हां वर्म पडेल ठावें ।
आवचटें घबाड सिणावें । नलगेचि कांहीं ॥ ७॥
पाहातां ऐसा कोण आहे । जो अंतरात्मा विवरोन पाहे ।
अल्प स्वल्प कळोन राहे । समाधानें ॥ ८॥
आरे हें पाहिलेंच पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें ।
वाचिलेंचि वाचावें । पुन्हापुन्हा ॥ ९॥
अंतरात्मा केवढा कैसा । पाहाणाराची कोण दशा ।
देखिल्या ऐकिल्या ऐसा । विवेक सांगे ॥ १०॥
उदंड ऐकिलें देखिलें । अंतरात्म्यास नवचे पुरविलें ।
प्राणी देहधारी बाउलें । काय जाणे ॥ ११॥
पूर्णास अपूर्ण पुरेना । कां जें अखंड विवरेना ।
विवरतां विवरतां उरेना । देवावेगळा ॥ १२॥
विभक्तपणें नसावें । तरीच भक्त म्हणवावें ।
नाहींतरी वेर्थचि सिणावें । खटाटोपें ॥ १३॥
उगाच घर पाहोन गेला । घरधनी नाहीं वोळखिला ।
राज्यामधूनचि आला । परी राजा नेणे ॥ १४॥
देहसंगें विषये भोगिले । देहसंगें प्राणी मिरवलें ।
देहधर्त्यास चुकलें । नवल मोठें ॥ १५॥
ऐसे लोक अविवेकी । आणि म्हणती आम्ही विवेकी ।
बरें ज्याची जैसी टाकी । तैसें करावें ॥ १६॥
मूर्ख अंतर राखों नेणे । म्हणौन असावें शाहाणे ।
ते शाहाणेहि दैन्यवाणे । होऊन गेले ॥ १७॥
अंतरीं ठेवणें चुकलें । दारोदारीं धुंडूं लागलें ।
तैसें अज्ञानास जालें । देव न कळे ॥ १८॥
या देवाचें ध्यान करी । ऐसा कोण सृष्टीवरी ।
वृत्ती येकदेंसी तर्तरी । पवाडेल कोठें ॥ १९॥
ब्रह्मांडीं दाटले प्राणी । बहुरूपें बहुवाणी ।
भूगर्भी आणि पाषाणीं । कितीयेक ॥ २०॥
इतुके ठाई पुरवला । अनेकीं येकचि वर्तला ।
गुप्त आणि प्रगटला । कितीयेक ॥ २१॥
चंचळें न होईजे निश्चळ । प्रचित जाणावी केवळ ।
चंचळ तें नव्हे निश्चळ । परब्रह्म तें ॥ २२॥

तत्वें तत्व जेव्हां उडे । तेव्हां देहबुद्धि झडे ।
निर्मळ निश्चळ चहुंकडे । निरंजन ॥ २३ ॥
आपण कोण कोठें कैंचा । ऐसा मार्ग विवेकचा ।
प्राणी जो स्वयें काचा । त्यास हें कळेना ॥ २४ ॥
भल्यानें विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा ।
अवघा वंशचि उधरावा । हरिभक्ती करूनी ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अंतरात्माविवरणनिरूपणनाम
समास आठवा ॥ ८ ॥ ११.८

समास नववा : उपदेश निरूपण

॥ श्रीराम ॥

आधीं कर्माचा प्रसंग । कर्म केलें पाहिजे सांग ।
कदाचित पडिले व्यंग । तरी प्रत्यवाय घडे ॥ १ ॥
म्हणौन कर्म आरंभिले । कांहींयेक सांग घडलें ।
जेथजेथें अंतर पडिलें । तेथें हरिस्मरण करावें ॥ २ ॥
तरी तो हरी आहे कैसा । विचार पाहावा ऐसा ।
संधेपूर्वी जगदीशा । चोविसां नामीं स्मरवें ॥ ३ ॥
चोवीसनामी सहस्रनामी । अनंतनामी तो अनामी ।
तो कैसा आहे अंतर्यामीं । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥
ब्राह्मण स्नानसंध्या करून आला । मग तो देवार्चनास बैसला ।
येथासांग तो पूजिला । प्रतिमादेवो ॥ ५ ॥
नाना देवांच्या नाना प्रतिमा । लोक पूजिती धरून प्रेमा ।
ज्याच्या प्रतिमा तो परमात्मा । कैसा आहे ॥ ६ ॥
ऐसें वोळखिलें पाहिजे । वोळखोन भजन कीजे ।
जैसा साहेब नमस्कारिजे । वोळखिल्याउपरी ॥ ७ ॥
तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहोन विचार ।
तरीच पाविजे पार । भ्रमसागरचा ॥ ८ ॥
पूजा घेताती प्रतिमा । आंगा येतो अंतरात्मा ।
अवतारी तरी निजधामा । येऊन गेले ॥ ९ ॥
परी ते निजरूपें असती । तें निजरूप ते जगज्जोती ।
सत्वगुण तयेस म्हणती । जाणती कळा ॥ १० ॥
तये कळेचे पोटीं । देव असती कोट्यानुकोटी ।
या अनुभवाच्या गोष्टी । प्रत्ययें पाहाव्या ॥ ११ ॥
देहपुरामधें ईश । म्हणोन तया नांव पुरुष ।
जगामधें जगदीश । तैसा वोळखावा ॥ १२ ॥
जाणीवरूपें जगदांतरें । प्रस्तुत वर्तती शरीरें ।
अंतःकरणविष्णु येणें प्रकारें । वोळखावा ॥ १३ ॥
तो विष्णु आहे जगदांतरीं । तोचि आपुले अंतरीं ।
कर्ता भोक्ता चतुरीं । अंतरात्मा वोळखावा ॥ १४ ॥
ऐके देखे हुंगे चाखे । जाणोन विचारें वोळखे ।
कित्येक आपुले पारिखे । जाणताहे ॥ १५ ॥
येकची जगाचा जिव्हाळा । परी देहलोभाचा आडताळा ।
देहसमंधें वेगळा । अभिमान धरी ॥ १६ ॥
उपजे वाढे मरे मारी । जैशा उचलती लहरीवरी लहरी ।
चंचळ सागरीं भरोवरी । त्रैलोक्य होत जातें ॥ १७ ॥
त्रैलोका वर्तवितो येक । म्हणोन त्रिलोक्यनायेक ।
ऐसा प्रत्ययाचा विवेक । पाहाना कैसा ॥ १८ ॥
ऐसा अंतरात्मा बोलिला । परी तोहि तत्वांमधें आला ।
पुढें विचार पाहिजे केला । माहावाक्याचा ॥ १९ ॥
आधीं देखिला देहधारी । मग पाहावें जगदांतरीं ।
तयाचेनियां उपरी । परब्रह्म पावे ॥ २० ॥
परब्रह्माचा विचार । होतां निवडे सारासार ।
चंचळ जाईल हा निर्धार । चुकेना कीं ॥ २१ ॥
उत्पत्ति स्थिति संव्हार जाण । त्याहून वेगळा निरंजन ।
येथें ज्ञानाचें विज्ञान । होत आहे ॥ २२ ॥
अष्टदेह थानमान । जाणोन जालियां निर्शन ।
पुढें उरे निरंजन । विमळ ब्रह्म ॥ २३ ॥
विचारेंचि अनन्य जाला । पाहाणाराविण प्रत्यय आला ।
तेहि वृत्ति निवृत्तीला । बरें पाहा ॥ २४ ॥
येथें राहिला वाच्यांश । पाहोन सांडिला लक्ष्यांश ।
लक्ष्यांशासारिसा वृत्तिलेश । तोहि गेला ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
उपदेश निरूपणनाम समास नववा ॥ ९ ॥ ११.९

समास दहावा : निस्पृह वर्तणूक

॥ श्रीराम ॥

मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो ।
जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥
तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित ।
प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥
कर्ता भोक्ता तत्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ।
त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ॥ ३ ॥
ऐसें महंते असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न सांपडावें । येकायेकी ॥ ४ ॥
कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लहान थोर समस्त ।
वेश पाहातां शाश्वत । येकचि नाहीं ॥ ५ ॥
प्रगट कीर्ति ते ढळेना । बहुत जनास कळेना ।
पाहों जातां आडळेना । काये कैसें ॥ ६ ॥
वेषभूषण ते दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणेविण येक क्षण । जाऊंच नेदी ॥ ७ ॥
त्यागी वोळखीचे जन । सर्वकाळ नित्य नूतन ।
लोक शोधून पाहाती मन । परी इच्छा दिसेना ॥ ८ ॥
पुर्तें कोणाकडे पाहेना । पुर्तें कोणासीं बोलेना ।
पुर्तें येके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ९ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें तरी जायेना ।
आपुली स्थिति अनुमाना । येवोंच जेदी ॥ १० ॥
लोकीं केलें तें चुकावी । लोकीं भाविलें तें उलथवी ।

लोकीं तर्किलें तें दावी । निर्फल करूनी ॥ ११॥
लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।
लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छा ॥ १२॥
एवं कल्पितां कल्पेना । न तर्कितांहि तर्केना ।
कदापी भावितां भावेना । योगेश्वर ॥ १३॥
ऐसें अंतर सांपडेना । शरीर ठाई पडेना ।
क्षणयेक विशंभेना । कथाकीर्तन ॥ १४॥
लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती ।
जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ १५॥
बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।
तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ १६॥
अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ १७॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।
उदंड समुदाये करावे । परी गुप्तरूपें ॥ १८॥
अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १९॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ २०॥
लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।
जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ २१॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां वेर्थ जातें ।
जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारें ॥ २२॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहीतरी ॥ २३॥
हें प्रचितीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ।
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीयेकें ॥ २४॥
महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देसीं ॥ २५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
निस्पृह
वर्तणूक निरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ ११.१०
॥ दशक अकरावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni